## पिंपरी चिंचवड महानगरपालिका , पिंपरी - ४११ ०१८
## जाहिरात क्रमांक - १८५/२००९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील निदेशक पदे भरणेकरीता मिळालेला अपुरा प्रतिसाद व अर्हताधारक कमी उमेदवार विचारात घेऊन सुधारित अर्हतेसह खालील निदेशक पदे भरणेकरीता अर्हताधारक उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पे बँड व ग्रेड वेतन | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | वायरमन निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | शै.पात्रता - संबंधित शाखेतील पदवी / पदवीका द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण किंवा संबंधित व्यवसायाचे NTC किंवा NAC परिक्षा उत्तीर्ण (एटीआय/सीटीआय उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल )<br>अनुभव - मान्यता प्राप्त तंत्र / व्यवसाय शिक्षण संस्थेतील शिकविण्याचा अथवा कंपनीतील तांत्रिक कामाचा पदवीधारकांसाठी १ वर्षाचा अनुभव , पदविका धारकांसाठी दोन वर्षाचा अनुभव<br>NTC साठी ३ वर्षाचा अनुभव<br>NAC साठी २ वर्षाचा अनुभव | १ | खुला - १ |
| २ | इन्स्ट्रुमेंट मेकॅनिक निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | | २ | अनु. जाती - १<br>खुला - १ |
| ३ | इलेक्ट्रिशियन निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | | ३ | अनु.जाती - १<br>अनु.जमाती - १<br>खुला - १ |
| ४ | इलेक्ट्रॉनिक मेकॅनिक निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | | २ | खुला - २ |
| ५ | प्लंबर निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | शै.पात्रता - स्थापत्य शाखेतील पदवी / पदवीका द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण किंवा संबंधित व्यवसायाचे NTC किंवा NAC परिक्षा उत्तीर्ण (एटीआय/सीटीआय उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल )<br>अनुभव - मान्यता प्राप्त तंत्र / व्यवसाय शिक्षण संस्थेतील शिकविण्याचा अथवा कंपनीतील तांत्रिक कामाचा पदवीधारकांसाठी १ वर्षाचा अनुभव , पदविका धारकांसाठी दोन वर्षाचा अनुभव<br>NTC साठी ३ वर्षाचा अनुभव<br>NAC साठी २ वर्षाचा अनुभव | १ | खुला - १ |
| ६ | वेल्डर निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | शै.पात्रता - यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेतील पदवी / पदवीका द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण किंवा संबंधित व्यवसायाचे NTC किंवा NAC परिक्षा उत्तीर्ण (एटीआय/सीटीआय उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल )<br>अनुभव - मान्यता प्राप्त तंत्र / व्यवसाय शिक्षण संस्थेतील शिकविण्याचा अथवा कंपनीतील तांत्रिक कामाचा पदवीधारकांसाठी १ वर्षाचा अनुभव , पदविका धारकांसाठी दोन वर्षाचा अनुभव<br>NTC साठी ३ वर्षाचा अनुभव<br>NAC साठी २ वर्षाचा अनुभव | २ | अनु.जाती - १<br>खुला - १ |
| ७ | मेकॅनिक मोटर व्हेईकल निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | शै.पात्रता - ॲटोमोबाईल शाखेतील पदवी / पदवीका द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण किंवा संबंधित व्यवसायाचे NTC किंवा NAC परिक्षा उत्तीर्ण (एटीआय/सीटीआय उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल )<br>अनुभव - मान्यता प्राप्त तंत्र / व्यवसाय शिक्षण संस्थेतील शिकविण्याचा अथवा कंपनीतील तांत्रिक कामाचा पदवीधारकांसाठी १ वर्षाचा अनुभव , पदविका धारकांसाठी दोन वर्षाचा अनुभव<br>NTC साठी ३ वर्षाचा अनुभव<br>NAC साठी २ वर्षाचा अनुभव | ३ | अनु.जाती - १<br>खुला - २ |
| ८ | इंजिनिअरींग ड्रॉईंग निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | शै.अर्हता - अभियात्रिकी / तंत्रशास्त्र शाखेतील किमान द्वितीय श्रेणीत पदवी / पदवीका उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता<br>अनुभव - मान्यताप्राप्त तंत्र / व्यवसाय शिक्षण संस्थेमधील किंवा औद्योगिक आस्थापनेतील शिकविण्याचा कामाचा अनुभव पदवीसाठी १ वर्ष व पदवीकेसाठी २ वर्ष | २ | अनु.जाती - १<br>खुला - १ |
| ९ | गणित निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | | २ | वि.जा.(अ) -१<br>खुला - १ |
| १० | समाज शास्त्र व शारिरीक शिक्षण निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | शै.अर्हता - बी.ए., बी.पी.एड. किंवा बी.एस.सी. बी.पी.एड .समाजशास्त्र विषयासह उत्तीर्ण<br>अनुभव - मान्यताप्राप्त तंत्र / व्यवसाय / माध्यमिक शिक्षण संस्थेमधील किमान १ वर्षाचा शिकविण्याचा अनुभव | १ | वि.मा.प्र. - १ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | संलग्न व्यवसाय निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | शै.अर्हता - विद्युत अभियांत्रिकी / तंत्र शास्त्र शाखेतील पदवी / पदविका द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण किंवा अभियांत्रिकी व्यवसायातील NTC किंवा NAC परिक्षा उत्तीर्ण (एटीआय/सीटीआय उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल )<br>अनुभव - मान्यताप्राप्त तंत्र / व्यवसाय शिक्षण संस्थेमधील अथवा कंपनीतील किमान ३ वर्षाचा तांत्रिक कामाचा अनुभव (प्रशिक्षण कालावधी व अनुभव मिळवुन ५ वर्ष किमान कालावधी होणे आवश्यक ) | १ | खुला - १ |
| १२ | मोटरवाहक निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | शै.अर्हता - एस.एस.सी. पास, संबंधित व्यवसायाचा आय.टी.आय. कोर्स व अॅटोमोबाईल पदविका उत्तीर्ण तसेच पुर्ण लाईट व हेवी लायसन्स सह दोन्ही प्रकारची वाहने चालविणेचा अनुभव<br>अनुभव - संबंधित पदाचा २ वर्षाचा अनुभव | १ | खुला - १ |
| १३ | कॉम्प्युटर ऑपरेटर अॅण्ड प्रोग्रॅ. असिस्टंट निदेशक | ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | शै.अर्हता - संबंधित शाखेची पदवी / पदविका किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण किंवा संगणक संबंधित A.D.C.S.S.A.A. प्रमाणपत्रधारक<br>अनुभव - मान्यताप्राप्त तंत्र / व्यवसाय शिक्षण संस्थेतील शिकविण्याचा अथवा कंपनीतील तांत्रिक कामाचा पदवीधारकांसाठी १ वर्षाचा अनुभव , पदविका धारकांसाठी दोन वर्षाचा अनुभव | १ | खुला - १ |

**टिप -** **१)** वर नमुद केलेल्या एकुण पदसंख्येत व प्रवर्गानिहाय आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

**२) निदेशक पदे भरण्यासाठी यापुर्वी दि. १९/०८/२००९ रोजी दै.सामना व दै.पुढारी या वृत्तपत्रांमध्ये देण्यात आलेल्या जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जांचा वरिल सुधारित अर्हतेनुसार भरतीसाठी विचार केला जाईल.**

**अटी व शर्ती -**

१) वरील पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवारांचे जाहिरातीचे दिनांकास किमान वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे. तसेच सर्वसाधारण प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथीलक्षम राहील) माजी सैनिक / प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त व खेळाडु यांच्यासाठी सर्वसाधारण उच्चवयोमर्यादा शासन निर्णयानुसार राहील. वरील पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी जाहिरातीच्या दिनांकास नमुद केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक राहील.

२) आधीच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेत असणा-या उमेदवारांना कमाल वयाची अट लागु राहणार नाही.

३) सोबत दिलेल्या विहित नमुन्यात ३० से.मी. x २० से.मी. आकाराच्या जाड पांढ-या कागदावर अर्ज करावा. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा. त्यावर पासपोर्ट आकाराचा नव्याने काढलेला व स्वतःचा स्वाक्षरी असलेला फोटो लावावा.खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी र.रु.२००/- व मागासवर्गीय उमेदवारांनी र.रु.१००/- इतके परीक्षाशुल्क असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा, मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे असणारा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) अर्जासोबत जोडावा. त्याकरीता मागास प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांचे जातीचे वैधता प्रमाणपत्राची अथवा जातीच्या दाखल्याची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत सदर परीक्षा शुल्क परत केले जाणार नाही. परिक्षा शुल्कासाठीचा धनाकर्ष (Demand Draft) अर्जासोबत प्राप्त न झाल्यास अर्ज अपात्र करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क माफ राहील. उमेदवारांने एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज केल्यास प्रत्येक अर्जासोबत परिक्षा शुल्कासाठीचा स्वंतत्र धनाकर्ष (Demand Draft) जोडणे आवश्यक आहे.

४) अर्ज मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८ यांच्या नावाने दि.०७/१२/२००९ पुर्वी पोहचतील अशा बेताने पोष्टाने पाठवावेत. कोणत्याही कारणास्तव वरील दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

५) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, जातीचा दाखला, अपंगत्वाचा दाखला, माजी सैनिक प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त, इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती तसेच जात

वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास त्याची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी. जन्मतारखेसाठी शाळा सोडल्याचा दाखला / जन्मनोंदीचा दाखला यांची साक्षांकित प्रत जोडावी. साक्षांकित प्रती केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्तर, मुख्याध्यापक तसेच साक्षांकनाबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच साक्षांकित केलेल्या असाव्यात. अर्जासोबत आवश्यक कागदपत्राच्या झेरॉक्स सत्यप्रती जोडलेल्या नसल्यास अर्ज अपात्र करण्यात येईल व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

६) उपरोक्त सर्व पदांसाठी आजपर्यंतच्या सर्व शासन निर्णयान्वये DOEACC सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा A स्तर , B स्तर , किंवा C स्तर किंवा MSCIT परिक्षा नेमणुक झाल्यापासुन १ वर्षामध्ये उत्तीर्ण होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

७) उमेदवाराची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक आहे. सदर नोंदणी कार्डाची सत्यप्रत अर्जासोबत जोडावी.

८) प्रमाणपत्राच्या मुळ प्रती (Original Certificate) अर्जासोबत जोडु नयेत.

९) निवड झालेल्या सर्व उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/सेवा-४, दि. ३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृती योजना ( Defined contribution Pension System) लागु राहील.

१०) शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज विहित मुदतीत त्यांचे कार्यालय प्रमुखांचे परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

११) छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी व तोंडी परिक्षा घेण्यात येईल.

१२) उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र त्याने अर्जासोबत जोडावे. उमेदवाराची अंतिम निवड झाल्यानंतर जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

१३) महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि. २५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार राहील.

१४) उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांचेजवळ जिल्हा सैनिक कल्याण बोर्डामध्ये नाव नोंदणी केलेले प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१५) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्रक्र६८/क्रीयुसे-२, दि. ३०/०४/२००५ नुसार राहील.

१६) मुलाखतीस बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१७) मुलाखतीस बोलविण्याचे अंतिम अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखुन ठेवले आहेत.

१८) महिला उमेदवार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१९) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस / मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्यावर अर्जदार विहित अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२०) महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. एस.आर.व्ही -२०००/प्रक्र१७/२०००/१२,दि. ०१/०७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दि. २८/०३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापत्र विहित नमुन्यात संबधित उमेदवाराने महापालिका सेवेत रुजु होताना सादर करणे आवश्यक राहील.

२१) **उमेदवार निवडीची पध्दत -**

महापालिकेस प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेची पत्रे पोष्टाने पाठविण्यात येतील. तसेच लेखी परिक्षेचे बैठक क्रमांक, बैठक व्यवस्था, परिक्षा केंद्र इ. बाबतचा तपशिल पत्राने कळविण्यात येईल तसेच महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल. लेखी परिक्षेमध्ये गुणानुक्रमे पात्र ठरणा-या उमेदवारांना मौखिक मुलाखतीची पत्रे लेखी परीक्षेचा निकाल जाहीर होताच समक्ष देण्यात येतील. तसेच महापालिकेच्या संकेतस्थळावर पाहता येईल. लेखी व मौखिक मुलाखतीमध्ये गुणानुक्रमे पात्र ठरणा-या उमेदवारांची निवडयादी व प्रतिक्षायादी महापालिकेच्या नोटीसबोर्डवर व वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

२२) टपाल खात्यामुळे झालेल्या कोणत्याही विलंबास अथवा टपाल गहाळ झाल्यास महापालिका जबाबदार राहणार नाही.

२३) जाहिरातीच्या अनुषंगाने अधिकृत अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरुन Download करुन घेता येईल.

सही/-
(आशीष शर्मा)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक - प्रशा/२/कावि/१५८०/२००९
दिनांक - १६/११/२००९

सहा.आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८

=[

# उमेदवाराने करावयाच्या अर्जाचा नमुना

| |
|---|
| **उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र** |

प्रति,
मा. आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

**विषय** :- --------------------- **पदासाठी अर्ज**

**संदर्भ :-** दिनांक / /२००९ रोजीच्या ______________________________ या
वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली जाहिरात क्रमांक - १८५/२००९

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी सरळसेवा प्रवेशाने ____________________ पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनाव स्वतःचे नाव वडील / पतीचे नाव

१) संपूर्ण नाव :- ____________________________________________

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :- ____________________________________________

____________________________________________

३) जन्मतारीख :-

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ | ९ | | |

४) लिंग - पुरुष स्त्री

५) जात :- ______________________

खालीलपैकी लागू असलेल्या प्रवर्गाखालील चौकटीत ✓ अशी खुण करावी.

| अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

६) सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प आदिंकडे नोंदणी केलेली असल्यास नोंदणी क्रमांक व दिनांक - ----------------------------

७) खालील प्रवर्गात मोडत असल्यास योग्य त्या चौकटीत ✓ खुण करावी.

| महिला | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | खेळाडु | अपंग | स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

८) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल :-

| **अ. क्र.** | **शैक्षणिक अर्हता** | **उत्तीर्ण वर्ष** | **मिळालेले एकूण गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९)  तांत्रिक पात्रता  - ________________________________________

१०)  अनुभव :- ________________________________________

________________________________________

११) परिक्षा शुल्क धनाकर्ष ( Demand Draft) क्र.                    , दि.     /     /२००९
र.रु.                         बँकेचे नाव  -

वर नमुद केलेला तपशिल खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणीत प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणीत करतो / करते  की, वर दिलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे नोकरी वरुन कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ   :

दिनांक :

अर्जदाराची सही

सहपत्रे : १)

२)